| | |
|---|---|
| ESTD - 1928 | **SNJB's**<br>**SHRIMAN SURESHDADA JAIN COLLEGE OF PHARMACY**<br>**JAIN GURUKUL, *NEMINAGAR,***<br>**AT/P. CHANDWAD**, Tal. Chandwad, Dist. Nashik-423 101. |

# NATIONAL SERVICE SCHEME (NSS)
## (D-SF-106)

| 2018-2019 | |
|---|---|
| **Date** | **Activity** |
| **21/06/2018** | International Yoga Day Celebration |
| **14/07/2018** | Tree Plantation |
| **05/08/2018** | Swacch Bharat Abhiyan |
| **28/09/2018** | Blood Donation Camp |
| **25/09/2018** | World Pharmacist Day Celebration |
| **23/10/2018** | Road Safety Awareness |
| **09/01/2019 to 15/01/2019** | NSS Special Winter Camp at Bhoyegaon |
| **27/02/2019** | Marathi Bhasha Din Celebration |
| **Grants / Funds received from University: 25,250/-** | |
| **Total Number of Students Benefited under NSS (Ordinance 163) - 17** | |

## NSS Unit Approval Letter from University 2018-19

D-SF-106

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

डॉ. प्रभाकर देसाई
एम.ए., पीएच.डी.
संचालक

कार्यालय क्र. : ०२०–२५६९७३४१
०२०–२५६०११५३
फॅक्स क्र. : ०२०–२५६९७३४१
मोबाईल : ९८८११०८०२०

संदर्भ : रासेयो/२७३/२०१८

दि. २१ Sep २०१८

प्रति,
मा.प्राचार्य,
श्री.नेमीनाथ जैन ब्रह्मचार्याश्रम (गुरुकुल) श्रीमान
सुरेशदादा जैन कॉलेज ऑफ फार्मसी पत्ता: मु
नेमिनगर ता.: चांदवड जि: नाशिक पिनकोड:
423101

**विषय: सन २०१८-२०१९ या वर्षासाठी राष्ट्रीय सेवा योजना स्वयंनिर्वाही एकक मान्यता.**

महोदय/महोदया,

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत शैक्षणिक वर्ष २०१८-२०१९ साठी आपल्या महाविद्यालयास ५० रासेयो विद्यार्थी स्वयंसेवक (पन्नास) संख्येचे स्वयंनिर्वाही एकक मंजूर करण्यात येत आहे. याकरिता आपल्या महाविद्यालयास रू.२१० प्रती विद्यार्थी x ५० रासेयो विद्यार्थी स्वयंसेवक संख्या = रु १०५०० या प्रमाणे अनुदान मंजूर करण्यात येत आहे. मंजूर अनुदानापैकी ७०% अनुदानाचा प्रथम हप्ता आपल्या रासेयो खात्यावर इ सी एस/एन ई एफ टी द्वारे वर्ग करण्यात येत आहे.

१. महाराष्ट्र शासनाने ठरवून दिलेल्या SC -११.८%,ST-९.४% व Other-७८.८% या संवर्गनिहाय तरतूदीनुसार रासेयोमध्ये स्वयंसेवकांना प्रवेश द्यावेत. त्यानंतर अल्पसंख्यांक विद्यार्थी संख्या स्वतंत्ररित्या नमूद करावी. प्रवर्गनिहाय संख्येनुसार रासेयो महाविद्यालयांना नियमित कार्यक्रमाचे अनुदान विद्यापीठामार्फत उपलब्ध होणार आहे याची नोंद घ्यावी.

२. महाविद्यालयाने रासेयो मंजूर विद्यार्थी संख्येपेक्षा जास्त विद्यार्थ्यांना प्रवेश देऊ नये. अतिरिक्त विद्यार्थी संख्येची संपूर्ण जबाबदारी सबंधित महाविद्यालयाची राहील.

३. राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत निवड केलेल्या स्वयंसेवकांच्या नावांची वर्गनिहाय व प्रवर्गानुसार यादी रासेयो कार्यालयास online जमा करावी. (यादी पाठविल्यानंतर त्यात कुठल्याही परीस्थितीत बदल होणार नाही.)

४. रासेयो मासिक अहवाल (Monthly Report) प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपर्यंत अपलोड करणे बंधनकारक आहे.

५. महाविद्यालयास स्वतंत्र पत्रव्यवहार न करता उपक्रमांसंदर्भात (www.unipune.ac.in/nss) या रासेयो लिंकवर वेळोवेळी परिपत्रके प्रसिद्ध केली जातील. त्यानुसार महाविद्यालयांनी कार्यक्रम आयोजित करून सदर अहवाल, छायाचित्र इ. रासेयो Web Portal वर तयार केलेल्या ठिकाणी अपलोड करावीत.

६. रासेयो नियमित कार्यक्रम व विशेष शिबिरे ह्या दरम्यान विभागीय समन्वयक , जिल्हा समन्वयक पूर्वसूचना न देता भेट देतील. त्यामुळे रासेयो कार्यक्रमांची व शिबिरांची नियमितता व सुसूत्रता अबाधित ठेवण्याची सर्व जबाबदारी आपल्या महाविद्यालयाची आहे.

७. केंद्र व राज्य शासनाने निर्धारित केलेल्या रासेयो कृतिकार्यक्रमांचे आयोजन व अंमलबजावणीची जबाबदारी आपल्या एककावर अपरिहार्यपणे येते. ह्या सर्व बाबींचे काटेकोर पालन व निर्धारण करण्याच्या अटीवर आपल्या रासेयो स्वयंनिर्वाही एककास मान्यता देत आहे.

कळावे, ही विनंती.

संचालक
राष्ट्रीय सेवा योजना

*टिप : केंद्रिय लेखापरीक्षणाच्या वेळी मानधनाकरिता मान्यतापत्र जोडणे आवश्यक आहे.*

**SNJB's**
**SHRIMAN SURESHDADA JAIN COLLEGE OF PHARMACY**
**JAIN GURUKUL, *NEMINAGAR,***
**AT/P. CHANDWAD**, Tal. Chandwad, Dist. Nashik-423 101.

ESTD - 1928

## NSS Program Officer (PO) Approval Letter from University 2018-19

D-SF-१०६

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

डॉ. प्रभाकर देसाई
एम.ए., पीएच.डी.
संचालक

कार्यालय क्र. : ०२० – २५६९७३४१
०२० – २५६०११५३
फॅक्स क्र. : ०२० – २५६९७३४१
मोबाईल : ९८८११०८०२०

संदर्भ : रासेयो/२७४/२०१९ दि : २१ Sep २०१८

प्रति,
मा.प्राचार्य,
श्री.नेमीनाथ जैन ब्रह्मचार्याश्रम (गुरुकुल) श्रीमान
सुरेशदादा जैन कॉलेज ऑफ फार्मसी पत्ता: मु
नेमिनगर ता.: चांदवड जि: नाशिक पिनकोड:
423101

विषय : सन २०१८-२०१९ या वर्षासाठी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी मान्यता.

महोदय/महोदया,

आपण पाठविलेल्या रासेयो एकक व कार्यक्रम अधिकारी मान्यता प्रस्तावानुसार आपल्या महाविद्यालयातील खालील शिक्षकांना राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी म्हणून मान्यता देण्यात येत आहे. सदर मान्यता शैक्षणिक वर्ष २०१८-२०१९ करिता असून पुढील वर्षी नव्याने पुन्हा मान्यता घेणे क्रमप्राप्त आहे.

रासेयो कार्यक्रम अधिकाऱ्यांना नव्याने मान्यता मिळाल्यापासून १ वर्षाच्या आत 'ETI , अहमदनगर' येथे प्रशिक्षण पूर्ण करणे आवश्यक आहे. कार्यक्रम अधिकारी म्हणून मान्यता मिळाल्यानंतर ३ वर्षे सलग राष्ट्रीय सेवा योजनेचे काम केले पाहिजे. तसेच ३ वर्षांचे रासेयो कार्यक्रम अधिकारी मान्यता पत्र, प्रशिक्षण पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र व कार्यक्रम अधिकारी कालावधीतील केलेल्या कामाचा संक्षिप्त अहवाल सादर केल्यानंतरच रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रशंसा प्रमाणपत्र (Appreciation Certificate) देण्यात येईल. राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत सन २०१८-२०१९ मधील नियमित कार्यक्रमांचा मासिक,तिमाही,सहामाही व वार्षिक अहवाल व विशेष शिबिराचा अहवाल दिलेल्या वेळेमध्ये राष्ट्रीय सेवा योजना कार्यालयास online पाठविण्याची जबाबदारी कार्यक्रम अधिकाऱ्यांची राहील. रासेयो विभागाने नियुक्त केलेल्या जिल्हा व विभाग समन्वयक यांना आपल्या महाविद्यालयातील रासेयो एककाविषयी व उपक्रमांविषयी वेळोवेळी माहिती देणे आवश्यक राहील.

राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने विविध शिबिरे/ स्पर्धांकरिता संघनायक म्हणून विद्यापीठाने नेमणूक केल्यास सदर शिबिरे/ स्पर्धांकरिता आपल्या रासेयो एककातील कार्यक्रम अधिकारी यांना 'संघनायक' म्हणून आपले योगदान देणे गरजेचे असेल. आपल्या सर्वांच्या सामूहिक योगदानावर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा राष्ट्रीय सेवा योजना विभाग प्रभावीपणे कार्यरत आहे, इथून पुढेही संरचनात्मक व संघभावनेचे सहकार्य आपल्या महाविद्यालयाकडून अपेक्षित आहे. सहकार्य करावे, कळावे, ही विनंती.

नियुक्त झालेले रासेयो कार्यक्रम अधिकारी

१.चोरडिया मयूर अशोक

संचालक
राष्ट्रीय सेवा योजना

*टिप : केंद्रिय लेखापरीक्षणाच्या वेळी मानधनाकरिता मान्यतापत्र जोडणे आवश्यक आहे.*

**SNJB's**
**SHRIMAN SURESHDADA JAIN COLLEGE OF PHARMACY**
**JAIN GURUKUL, *NEMINAGAR,***
**AT/P. CHANDWAD**, Tal. Chandwad, Dist. Nashik-423 101.

## NSS Letter for Winter Special Camp from University 2018-19

D-SF-१०६

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
राष्ट्रीय सेवा योजना
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

डॉ. प्रभाकर देसाई
एम.ए., पीएच.डी.
संचालक

कार्यालय क्र. : ०२०–२५६९७३४१
०२०–२५६०११५३
फॅक्स क्र. : ०२०–२५६९७३४१
मोबाईल : ९८८११०८०२०

संदर्भ : रासेयो/३५६/२०१८

दि : १७ Dec २०१८

प्रति,
मा.प्राचार्य,
श्री.नेमीनाथ जैन ब्रह्मचार्याश्रम (गुरुकुल) श्रीमान
सुरेशदादा जैन कॉलेज ऑफ फार्मसी पत्ता: मु
नेमिनगर ता.: चांदवड जि: नाशिक पिनकोड:
423101

विषय : २०१८-२०१९ राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबिर मान्यता देणेबाबत.

महोदय/महोदया,

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आपल्या महाविद्यालयास सन २०१८-२०१९ वर्षातील विशेष शिबिराकरिता २५ (अक्षरी **पंचवीस** )स्वयंसेवक शिबिरार्थी संख्या मान्य करण्यात आलेली आहे. त्यानुसार विशेष शिबिर आयोजनास आपल्या महाविद्यालयास प्रती स्वयंसेवक शिबिरार्थी रु. 590/- प्रमाणे २५ स्वयंसेवक शिबिरार्थी संख्येकरिता रू. १४७५० अनुदान मंजूर करण्यात आलेले आहे. यापैकी प्रती स्वयंसेवक शिबिरार्थी रू. 300/- प्रमाणे प्रथम हप्ता आपल्या रासेयो खात्यावर इ सी एस/एन ई एफ टी द्वारे वर्ग करण्यात येईल.

आपल्या प्रस्तावास अनुसरुन रासेयो विशेष शिबिरास दि. ०९ Jan २०१९ पासून १५ Jan २०१९पर्यंत मु. Bhoyegaon ता. Chandwad जि. NASHIK या ठिकाणी आयोजन करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांनी निर्गमित केलेल्या शासन निर्णय क्र. रासेयो/-2014/प्र.क्र. 42/14/साशि-7 परिपत्रकानुसार महाराष्ट्र राज्यातील सर्व विद्यापीठांमधील रासेयो संलग्नीत महाविद्यालयांमधील स्वयंसेवकांकरिता कृती आराखड्यानुसार उपक्रम राबवण्यात यावेत. याकरिता सरपंच, पंचायत समिती, ग्रामविकास अधिकारी, तलाठी व तहसीलदार इ. शासकीय अधिकारी/यंत्रणा यांची मदत घ्यावी. तसेच विद्यार्थी स्वयंसेवक व स्थानिक गावकरी यांच्या एकत्रित सहकार्याने विविध प्रकारचे उपक्रम विशेष शिबिराच्या कालावधीत मोठ्या प्रमाणात व्हावेत ही अपेक्षा आहे.ह्या परिपत्रकाद्वारे जाहीर केलेल्या नियमावलीनुसारच आपले रासेयो शिबिर आयोजित करणे बंधनकारक आहे. शिबिरास वर्तमानपत्र तसेच इतर माध्यमातून योग्य त्या सदरातून प्रसिद्ध द्यावी.

शिबीराचे हिशेब केंद्रीय पद्धतीने सादर करावेत. हिशेबाच्या कागदपत्रांबरोबर 'ब' फॉर्म सादर करणे आवश्यक आहे. शिबिरानंतर सविस्तर अहवाल 10 दिवसांच्या आत पाठवावा. त्यासोबत शिबिरातील उपक्रमाची छायाचित्रे, बातमी व कात्रणे पाठवावीत. शिबिर अहवालासोबत शिबिरात केलेल्या श्रमदानाचे मूल्यमापन करुन पाठवावे. योग्य त्या अधिका-यांच्या (सरपंच/तहसिलदार/गटविकास अधिकारी) दाखला जोडावा. त्यात केलेल्या कामाचा अंदाजे खर्च नमूद करावा. केंद्रीय लेखापरिक्षणाच्या वेळी हिशोबासोबत सदर मान्यतापत्राची छायांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.

आपणास शिबिरासाठी हार्दिक शुभेच्छा ! कळावे, ही विनंती.

संचालक
राष्ट्रीय सेवा योजना

*टिप : केंद्रिय लेखापरीक्षणाच्या वेळी मानधनाकरिता मान्यतापत्र जोडणे आवश्यक आहे.*



**Tree Plantation**



**Blood Donation Camp**

| | |
|---|---|
| | **SNJB's**<br>**SHRIMAN SURESHDADA JAIN COLLEGE OF PHARMACY**<br>**JAIN GURUKUL, *NEMINAGAR,***<br>**AT/P. CHANDWAD**, Tal. Chandwad, Dist. Nashik-423 101. |




**World Pharmacist Day Celebration**




**Road Safety Awareness**

**SNJB's**

**SHRIMAN SURESHDADA JAIN COLLEGE OF PHARMACY**

**JAIN GURUKUL, *NEMINAGAR,***

**AT/P. CHANDWAD**, Tal. Chandwad, Dist. Nashik-423 101.



**Winter Special Camp at Bhoyegaon**



**Winter Special Camp at Bhoyegaon**



**Winter Special Camp at Bhoyegaon**



**Winter Special Camp at Bhoyegaon**



चांदवड तालुक्यातील भोयेगाव येथे आबड, लोढा, सुराणा जैन महाविद्यालयाच्या वतीने आयोजित एन.एस.एस. शिबिरात बोलताना प्राचार्य डॉ. एम.डी. कोकाटे, शिवनाथ बोरसे, डॉ. दत्ता शिंपी, डॉ. सुरेश पाटील, डॉ. तुषार चांदवडकर, प्रा. स्वप्निल वाघ, सरपंच मंगलबाई ठोंबरे, उपसरपंच उत्तमराव ठोंबरे, प्रा. दीपेश अग्रवाल, डॉ. मयुरेश चोरडिया, डॉ. सारिका शिंदे, दादा ठोंबरे आदी.

# भोयेगावी राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिराचे उद्घाटन

लोकमत न्यूज नेटवर्क

**चांदवड** : ज्या समाजात आपण राहतो, मोठे होतो त्या समाजाचे आपण देणे लागतो. ही भावना एन.एस.एस. शिकविते. त्यामुळे एन.एस.एस. ही व्यक्तिमत्त्व विकास करणारी चळवळ आहे, असे प्रतिपादन स्व.कांताबाई भवरलाल जैन अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम.डी. कोकाटे यांनी केले. चांदवड तालुक्यातील भोयेगाव येथे आबड, लोढा, जैन महाविद्यालय, स्व. कांताबाई भवरलाल जैन अभियांत्रिकी महाविद्यालय, सुरेश दादा जैन औषधनिर्माण शास्त्र महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने शिबिर संपन्न झाले.

अध्यक्षस्थानी कृषिभूषण शिवनाथ बोरसे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून सरपंच मंगलाताई ठोंबरे, उपसरपंच उत्तमराव ठोंबरे, शिवाजी बर्डे, सोसायटीचे सभापती दादा रेवजी ठोंबरे, डॉ. सुरेश पाटील, डॉ. दत्ता शिंपी, प्रा.एस.पी. खैरनार, डॉ. तुषार चांदवडकर आदी व्यासपीठावर उपस्थित होते. प्रास्ताविक प्रा. स्वप्निल वाघ यांनी केले, तर डॉ. सुरेश पाटील, उपसरंपच उत्तमराव ठोंबरे यांची भाषणे झालीत. कृषिभूषण शिवनाथ बोरसे यांनी गावाच्या हितासाठी हे शिबिर महत्त्वाचे असून पाणी अडवा, पाणी जिरवा या योजनेखाली विद्यार्थ्यांनी बंधारा तयार करावा व एक चांगला आदर्श घालून द्यावा, असे आवाहन केले.

पाहुण्यांचा परिचय प्रा. दीपेश अग्रवाल यांनी तर आभार डॉ. मयूर चोरडिया यांनी मानले. सूत्रसंचालन डॉ.तुषार चांदवडकर यांनी केले शिबिराचे नियोजन अमोल बडोदे, स्वाती पानगव्हाणे, महेश वाळके, राधिका शिंदे यांनी केले.

SNJB's
**SHRIMAN SURESHDADA JAIN COLLEGE OF PHARMACY**
**JAIN GURUKUL, *NEMINAGAR,***
**AT/P. CHANDWAD**, Tal. Chandwad, Dist. Nashik-423 101.

दैनिक दिव्य मराठी

23-Jan-2019
नाशिक जिल्हा Page 16

नाशिक जिल्हा | संमिश्र

**श्रमसंस्कार शिबिर** • तीन महाविद्यालयांचा संयुक्त उपक्रम; विद्यार्थ्यांकडून स्मशानभूमीची स्वच्छता

# भोयेगावी रासयोच्या १७५ विद्यार्थ्यांनी उभारले तीन दगडी बंधारे व २० शोषखड्डे

प्रतिनिधी | चांदवड



भोयेगाव येथे शोषखड्डे तयार करताना राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी.



दगडी बंधारे तयार करताना राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी-विद्यार्थिनी.

येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, स्व. सौ. कांताबाई भवरलालजी जैन अभियांत्रिकी महाविद्यालय व सुरेशदादा जैन औषधनिर्माण महाविद्यालय या तीन महाविद्यालयांच्या संयुक्त विद्यमाने तालुक्यातील भोयेगाव येथे आयोजित राष्ट्रीय सेवा योजनेच्या हिवाळी श्रमसंस्कार शिबिरात तिन्ही महाविद्यालयातील १७५ विद्यार्थ्यांनी भोयेगावी तीन दगडी बंधारे व वीस शोषखड्डे तयार करून स्मशानभूमी परिसराची स्वच्छता व गावातील जैविक परीक्षणाचे काम केले. विद्यार्थ्यांनी उभ्या केलेल्या जलसंधारणाच्या कामाचे शिबिराच्या समारोपप्रसंगी मान्यवरांनी कौतुक केले.

शिबिर समारोप कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सी. डी. उपासणी होते. प्रमुख अतिथी म्हणून प्रांताधिकारी सिद्धार्थ भंडारे, पोलिस निरीक्षक संजय पाटील उपस्थित होते.

प्रांताधिकारी सिद्धार्थ भंडारे म्हणाले, ज्या समाजात आपण जन्माला येतो, मोठे होतो, त्या समाजाचे आपण काही देणे लागतो ही भावना ठेवून राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरांमध्ये उभी रहात असलेली कामे अत्यंत महत्त्वाची असतात. विद्यार्थ्यांनी शिबिरात उभे केलेले काम कौतुकास्पद असल्याचे सांगून विद्यार्थ्यांनी आज परिस्थितीचा बाऊ न करता गुणवत्तेला महत्त्व देऊन स्पर्धा परीक्षांकडे अधिकाधिक लक्ष द्यावे, गरजू विद्यार्थ्यांना मी व्यक्तीशः सहकार्य करेल, असे आश्वासन दिले.

राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक प्रा. डॉ. डी. के. आहेर यांनी या शिबिरामुळे विद्यार्थ्यांमध्ये बांधिलकी निर्माण होत असल्याचे सांगून विद्यार्थ्यांनी संयुक्त श्रमदानातून केलेल्या कामाचे कौतूक केले. पोलिस निरीक्षक संजय पाटील यांनी अशा प्रकारच्या शिबिराची युवा पिढीसाठी अत्यंत गरज असून त्यातून विद्यार्थ्यांना कष्टाची सवय लागते तसेच शिस्तिचे महत्त्वही समजते. त्यामुळे आजच्या पिढीसमोर आदर्श ठेवण्यासाठी यांसारखी शिबिरे महत्त्वाची असल्याचे सांगितले.

प्राचार्य डॉ. जी. एच. जैन म्हणाले, शिबिरात विद्यार्थ्यांनी मेहनत घेतली असली तरी अशा प्रसंगी गावानेही पुढाकार घेतला पाहिजे. गावाची साथ मिळाली तरच अशा स्वरुपाची शिबिरे अधिक यशस्वी होऊ शकतात, असे आवाहन केले. अभियांत्रिकी महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. दीपेश अग्रवाल यांनी या सामूहिक शिबिरामुळे विद्यार्थ्यांची मैत्री व समूहभावना वृद्धिंगत होऊन विद्यार्थ्यांना खूप काही शिकता आल्याचे सांगितले. प्रारंभी प्रा. स्वप्नील वाघ यांनी सप्ताहातील कामाचा अहवाल सादर केला. अतिथींचा परिचय डॉ. मयूर चोरडिया यांनी करून दिला. शिबिरातील स्वयंसेवक विद्यार्थ्यांनीही शिबिरातील अनुभव सांगितले. सूत्रसंचालन चांदवड महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. तुषार चांदवडकर यांनी केले. यावेळी उपप्राचार्य डॉ. दत्ता शिंपी, संदेश बुरड, नारायण महाराज, गोरख पानपाटील, आकाश टोंबरे, महेश वाळके, रोहित वाळके, सौरभ जैन आदींसह शिबिरार्थी उपस्थित होते. शिबिर यशस्वितेसाठी अमोल बडोदे, अजय टाकरे, स्वाती पानगव्हाणे, सौरभ जैन, सूरज पगार, नीलेश चव्हाण, वैभव पवार, भूषण टोंबरे या विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

### शिबिरात विविध व्याख्याने, रक्तगट तपासणी

शिबिर काळात प्रा. डॉ. मनोज पाटील यांचे 'वनस्पतीशास्त्रातील गमतीजमती', प्रा. डॉ. सी. के. कुदनर यांचे 'ग्रामविकासाची गुरुकिल्ली', प्रा. सुभाष सोनवणे यांचे 'सैन्य भरतीपूर्व प्रशिक्षण', प्रा. एन. पी. जैन यांचे 'रोखविरहित व्यवहार', प्रा. पी. आर. सोहनी यांचे 'होय मला एनएसएसने घडविले', शिवनाथ बोरसे यांचे 'अशी फुलली नर्सरी', पाणी फाउंडेशनचे समन्वयक दीपक सैंदाणे यांचे 'जलसंधारणाच्या वाटा' या विषयावर व्याख्याने झाली. शिबिरात विद्यार्थी-विद्यार्थिनींची रक्तगट तपासणीही करण्यात आली.